# रस्त्यावरील निराधार बांधवांच्या पुनर्वसनासाठी....

VISIT US AT
www.jasngo.org



Jeevan Aanand Sanstha
JAS
Rehabilitation Center for Roadside & Helpless People

# जीवन आनंद संस्था

नोंदणी क्र. एफ - ५४६०१ (मुंबई)

हरवले आभाळ ज्यांचे होऊ तयांचे 'सोबती'..सापडेना वाट ज्यांना होऊ तयांचे 'सारथी'

---

10 / बी, साईप्रसाद, 4 था रस्ता, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ-पूर्व, मुंबई 400055

# जीवन आनंद संस्था

## संस्थेची स्थापना

सन २००० पासून श्री. संदीप परब हे रस्त्यावरील वंचित महिला, मुले, निराधार बांधव या घटकांसोबत काम  करीत आहेत. रस्त्यावरील या बेघर, असहाय्य व्यक्तींना अन्न, वस्त्र, निवारा आणि औषधोपचार इ. माध्यमातून ते सहाय्य करीत होते. रस्त्यावरील निराधार वंचित व्यक्तींची ऊन, वादळ, थंडी, तुफानी पाऊस, मुंबईतील पुरा दरम्यान दयनीय परिस्थिती पाहून त्यांचे मन अस्वस्थ होत होते. रस्त्यावरील वंचित, निराधार, असहाय्य व्यक्तींनाही माणूस म्हणून सन्मानाने जगता आले पाहिजे याच विचार-भूमिकेतून त्यांनी सहकाऱ्यांच्या सोबतीने २०१३ मध्ये जीवन आनंद संस्थेची स्थापना केली.

## संस्थेचे ध्येय

**रस्त्यावरील वंचित, दुर्लक्षित, निराधार बांधव आणि पदपथावरील वंचित नागरिक या घटकांना माणूस म्हणून सन्मानाचे जीवन मिळण्यासाठी कार्य करणे.**




## संस्थेची मूल्ये

**सहवेदना (Empathy):** रस्त्यावरील वंचित , निराधार माणसांच्या जीवनातील त्रास, त्यांच्या भावना आणि दुःख समजून घेण्याची समज आणि क्षमता संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे आहे.

**उत्तरदायित्व (Accountability):** जीवन आनंद संस्था रस्त्यावरील वंचित, निराधारांमधील गरजू आणि पात्र व्यक्तींच्या हितासाठी संस्थेमार्फत करीत असलेल्या प्रत्येक कृतीसाठी जबाबदार आहे.

**उत्कटता (Passion):** जीवन आनंद संस्थेमध्ये करण्यात येणारे प्रत्येक काम आणि सेवा ही अंतःकरणापासून आणि उत्कटतेने व आवडीने करण्यात येते.

**आदर (Respect):** जीवन आनंद संस्थेमध्ये लिंग, जात , धर्म , वंश आणि इतर कोणत्याही कारणावरून सामाजिक भेद मानला जात नाही आणि संस्थेत सर्वांचा समान आदर केला जातो.

**अखंडता (Integrity):** जीवन आनंद संस्थेचे कार्य सचोटीने व प्रामाणिकपणे चालते. संस्थेच्या प्रत्येक कृतीला मानवी मूल्ये आणि नैतिक आचरणाचे अधिष्ठान आहे.

**प्रेम (Love):** जीवन आनंद संस्थेच्या आश्रमात बांधवांची प्रेम आणि आस्थेने सेवा करण्यात येते.

## संस्थेची दृष्टी

> “ ज्यांचे या जगात कोणीही नाही ते जीवन आनंद संस्थेचे आहेत. कोणीही अनावश्यकपणे बेघर आणि अन्न, वस्त्रापासून वंचित राहू नये.

## संस्थेची उद्दिष्टे

- रस्त्यावरील वंचित, निराधार ,वयोवृध्द, मानसिक रूग्ण यांना आश्रमच्या माध्यमातून सकस अन्न-वस्त्र-निवारा, करमणूकीच्या सुविधा मिळवून देणे.
- रस्त्यावरील वंचित, निराधार, वयोवृध्द, मानसिक रूग्ण यांना आश्रमच्या माध्यमातून आरोग्य सुविधा, समुपदेशन सुविधा देणे.
- रस्त्यावरील वंचित, निराधार, वयोवृध्द, मानसिक रूग्ण यांच्या नातलगांचा शोध घेवून त्यांचे कुटुंबांत सुयोग्य पुनर्वसन करणे.
- रस्त्यावरील वंचित, निराधार, वयोवृध्द ,मानसिक रूग्ण यांचेपैकी नातलगांचा शोध न लागलेल्या/कुटुंबियांनी न स्वीकारलेल्या बांधवांचे संस्थेच्या आश्रम आणि शेल्टर होममधून पुनर्वसन करणे.
- आश्रमांत पुनर्वसन करण्यात आलेल्या बांधवांना शेती,स्वच्छता मोहिम सारख्या उपक्रमांत सहभागी करून त्यांचे सामाजिक पुनर्वसन करणे.
- पदपथावर राहणा-या कुटुंबांतील बालकांसाठी डे केअर सेंटर चालवून त्यांना सकस आहार, संगोपन, आरोग्य सुविधा पुरविणे.
- पदपथावरील बालकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध पुरक उपक्रमांचे आयोजन करणे.
- रस्त्यावरील वंचित, निराधार, वयोवृध्द, मानसिक रूग्ण यांना माणूस म्हणून सन्माने जगता येण्यासाठी आवश्यक त्या कार्यक्रम उपक्रमांचे आयोजन करणे.


## संस्थेचे ठळक मुद्दे

- संस्थेच्या 4 आश्रमांद्वारे 220 बांधवाना निवारा, अन्न, उपचार आणि मनोरंजनासाठी आधार देत आहोत. आजपर्यंत आम्ही 700+ बांधवांचे पुनर्वसन केले आहे; त्यांना त्यांच्या कुटुंबीयांशी किंवा त्यांची देखभाल करणाऱ्या संस्थांशी भेट करून दिली आहे.
- आश्रमांच्या शाश्वत विकासासाठी आम्ही कृषी प्रकल्प राबवत आहोत.
- आश्रमात ६०% पेक्षा जास्त मनोरुग्ण बांधव आहेत. ते आश्रमात मुक्त वातावरणात शांततेचे जीवन जगत आहेत.
- जीवन आनंद संस्थेकडून आजवर शाळा-महाविद्यालयामध्ये ४०००० हुन अधिक विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.

# जीवन आनंद संस्था

## रस्त्यावरच्या निराधार , वंचितांबाबत संस्थेचा दृष्टिकोन आणि कार्यप्रणाली

- संस्थेमध्ये योग्य मानसोपचार तज्ञ , डॉक्टर, नर्स, प्रकल्प प्रभारी, सामाजिक कार्यकर्ते आणि काळजी घेणाऱ्या सेवकांच्या साहाय्याने बांधवांचे / रुग्णांचे योग्य पुनर्वसन करणे हा दृष्टिकोन आहे.
- संस्थेमध्ये राहणाऱ्या बांधवांच्या आरोग्याची योग्य काळजी घेऊन त्यांचे आरोग्य सुधारणे व जीवनाचा दर्जा उंचावणे हे संस्थेचे प्राथमिक कर्तव्य आहे
- संस्थेमार्फत निराधार वंचित बांधवांचे त्यांच्या कुटुंबासोबत पुनर्मिलन करण्यात येते व पुनर्वसनासाठी त्यांना व त्यांच्या कुटुबियांना योग्य मार्गदर्शन व मदत करण्यात येते.
- संस्थेचा दृष्टिकोन हा मानवतावादी आहे आणि त्यामुळे त्याचा संस्थेमार्फत समाजामध्ये काम करताना चांगला उपयोग होत आहे .
- मनोरुग्ण घरात असलेल्या कुटुंबाना समाजात कलंक आणि अपमानाचा सामना करावा लागतो. अशावेळी ग्रामीण आणि शहरी भागात मानसिक आजार असलेली माणसं योग्य उपचारांअभावी कुटुंबापासून दुरावतात आणि रस्त्यावरचं निराधार वंचित जीवन जगू लागतात. जीवन आनंद संस्था अशा वंचितांसाठी कार्य करत आहे.
- संस्थेमार्फत शाळा, कॉलेजेसमधून 'आजी आजोबांची काळजी कशी घ्यावी ' व 'रस्त्यावरील वंचितांचे जीवन' या विषयावर व्याख्याने व माहिती देवून नवीन पिढीमध्ये जेष्ठ नागरिकांविषयी संवेदनशीलता वाढविण्यासाठी कार्य केले जात आहे.
- संस्थेमार्फत पदपथावरील कुटुंबात राहणाऱ्या बालकांना डे- केअर सेंटर द्वारे सकस आहार (नाश्ता ,जेवण ) दिले जाते व त्यांना अभ्यासात साहाय्य केले जाते. त्यांचेवर चांगले संस्कार होण्यासाठी विविध पूरक उपक्रम राबविले जात आहेत.




## जासद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या सुविधा


- **स्वच्छता:** रस्त्यावरील निराधार वंचित व्यक्तीची सविस्तर माहिती घेवून आश्रमात आणल्यानंतर आंघोळ घालण्यात येते. शौचविधीची सुविधा देण्यात येते.
- **भोजन-नाश्त्याची व्यवस्था:** आंघोळीनंतर बांधवास/रूग्णास वेळेनुसार चहा/कॉफी बिस्किटे व नंतर पौष्टिक भोजन दिले जाते.
- **आरोग्य सेवा:** वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर कडून बांधवाची/रूग्णाची वैद्यकीय तपासणी करून आवश्यक उपचार देण्यात येतात. गंभीर आजार असल्यास पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करून वैद्यकीय सहाय्य देण्यात येते.
- **पुनर्वसन:** निराधार, वंचित बांधवाचे कुटुंबातील पुनर्वसन एका प्रक्रीयेद्वारे केले जाते. सुरूवातीला मिळालेल्या माहितीची पडताळणी, प्राथमिक संपर्क, गृहभेट, संवाद, पाठपुरावा इत्यादीचा यामध्ये समावेश असतो.
- **प्रवेश व मृत्युसमयी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब:** बांधवाच्या आश्रमातील प्रवेशावेळी व आश्रमात झालेल्या मृत्यनंतर अंत्यविधी करण्याआधी रितसर, कायदेशीर प्रक्रिया अवलंबिली जाते.









## संस्थेचे उपक्रम

- ज्येष्ठ नागरिक गरजूंना सहाय्य
- आश्रमांमध्ये पुनर्वसन
- विविध सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करणे करणे.
- समुपदेशन आणि उपचार सत्रे
- पदपथावरील कुटुंबातील बालकांसाठी डे-केअर सेंटर (संस्कार केंद्र)
- श्वास बाल रक्षा प्रकल्प
- ज्येष्ठ नागरिकांसाठी आधार प्रकल्प
- सामाजिक विषयांवर व्याख्याने आणि चर्चासत्र
- उपजीविका प्रकल्प (शेती आणि भाजीपाला लागवड)
- रस्त्यावरील वंचितांचे कुटुंबातील पुनर्वसन
- शाळा-महाविद्यालयांमध्ये 'आजी आजोबांचे आपल्या जीवनातील महत्व' या विषयावर मार्गदर्शन
- पदपथावरील वंचित कुटुंबाना धान्य आणि कपडे वाटप
- गाव-वस्त्या, रस्ते आणि स्मशानभूमी इ. ठिकाणी स्वच्छता मोहीम

## भविष्यातील योजना

- संस्थेतील आश्रमांचा विस्तार करणे.
- आश्रमातील बांधवाना त्यांच्या कार्यक्षमतेनुसार प्रशिक्षण देऊन सक्षम बनविणे.
- विविध सामाजिक उपक्रम राबवून लोकांचा सहभाग करून घेणे.
- विविध शाळा आणि कॉलेजांमधून व्याख्याने देऊन नवीन पिढीस ज्येष्ठ नागरिकांविषयी संवेदनशील बनविणे.

## आपणही यात योगदान देऊ शकता.

- तुम्ही नवीन व जुन्या वस्तु स्वरूपात किंवा आर्थिक स्वरूपात मदत करू शकता.
- तुमच्या आनंदाचे क्षण आश्रमातील बांधवांसोबत साजरे करू शकता.
- आश्रमाच्या कामासंदर्भात प्रचार व प्रसार करू शकता.
- आश्रमातील एका व्यक्तीचा एक दिवस, महिना किंवा वर्षाचा खर्च मदत स्वरूपात देऊ शकता.
- संस्थेचे विविध उपक्रम आणि दैनंदिन कामामध्ये सेवाभावी कार्यकर्ते म्हणून सहभागी होऊ शकता.

**संस्थेला आर्थिक स्वरूपात मदत करायची असल्यास चेक अथवा रोख रक्कम "जीवन आनंद संस्था" (Jeevan Aanand Sanstha) या नावाने द्यावी.**

**Account Name :**

**Jeevan Aanand Sanstha**

**मुंबई विभाग :**

Bank Name: State Bank of India
Account No- 34033900433
IFSC Code-SBIN0004613
Branch - Khar (W)

**सिंधुदुर्ग विभाग:**

Branch Name: State Bank of India
Account No- 33558699349
IFSC Code-SBIN0004511
Branch -Sindhudurgnagari

**सिंधुदुर्ग विभाग:**

Bank Name: Sindhudurg District Central Co. Op. Bank
Account No- 036407000000111
IFSC Code-SIDC0001036
Branch - Pandur

**गोवा विभाग:**

Bank: State Bank of India
Branch: Bicholim(Goa) Church Square
Account No: 40264127268
IFSC Code: SBIN0000289

# आमची वाटचाल

### रस्त्यावरील निराधार बांधवांच्या पुनर्वसनासाठी....

## 2021

**किनळोस प्रकल्प**
मु. किंलोस, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग, पिन-416 520

**सुरक्षा डे-केअर सेंटर**
रुम नं. 203, दुसरा मजला, पटेल कंपाऊंड,
गुरुद्वारा समोर,रोड नं. 3,
खार रोड(पश्चिम), मुंबई-400055
संपर्क: अपेक्षा पाटील: 77589 94454

**"माँ" आसरोघर**
अनिला प्रांगण, ओपावाडा, खुंटादेवी मंदिरा शेजारी,
गोवा, ओपा-खांडेपार, फोंडा , पिन-404 040
संपर्क: प्रसाद आंगणे 98345 34869

## 2020

**कै. सुप्रियाताई वेंगुर्लेकर पुनर्वसन केंद्र**
स्थळकरवाडी, मु.पो. अणाव, ता. कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग-416 812
संपर्क: आशिष कांबळी: ९३२६७ २१९८८

**समर्थ आश्रम**
मु. पो. खैरपाडा (वरठा पाडा),
विरार फाट्याजवळ, विरार (पूर्व), जि. पालघर-401 303
संपर्क: किसन चौरे: ९२७०७ ८५१८२
भाईदास माळी : ८३२९९ १२६५९

**संगम प्रकल्प**
नदी किनारा, धोबी घाट,
संतोषी माता रोड, गणेश मंदिर जवळ,
दहिसर (पश्चिम), मुंबई-400068
संपर्क:
कल्पना चौघुले: 88981 82552

## 2015

## 2013

**कार्डर डे-नाईट शेल्टर**
आनंद संगम सहकारी गृहनिर्माण संस्था,खोली क्र. 48,
तळमजला,वाकोला पोलिस स्टेशनच्या मागे,
वाकोला, सांताक्रूझ (पू), मुंबई - 55
संपर्क: संतोष पुजारे-९८२०६ ६०२२२
संपदा सुर्वे-८५९१९ ८१९९६

**संविता आश्रम**
मु.पो. पणदूर, साईलवाडी,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-416 812
संपर्क: देऊ सावंत: ९३०९९ ६४८५१
आरती वायंगणकर: ९३२६७ २१९६९